# प्रेस नोट

दिनांक २८/०४/२०२१

**पंचायत समिती, वाडा, पालघर येथील बालविकास प्रकल्प अधिकारी व अंगणवाडी सेविकेस लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली अटक**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे (कॅम्प पालघर)** |
|---|---|
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | वाडा पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र. १४२/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम(संशोधन २०१८)सन १९८८ कलम ७, ७अ, १२ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. गोरक्ष अशोक खोसे, वय- ३० वर्षे, बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती, वाडा, पालघर वर्ग २<br>२) श्रीमती कल्पना हरी गवळी, वय ५० वर्षे, अंगणवाडी सेविका, वाडा पालघर वर्ग ४ |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | २१,०००/—रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/—रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार हया अंगणवाडी सेविका मदतनीस असून त्यांना नोकरीवर कायम करण्याकरीता वरील नमुद लोकसेवक क्र १ यांनी तक्रारदार यांच्याकडे २१,०००/—रुपये लाचेची मागणी केली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०४/२०२१ रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने अेसीबी, पालघर युनिटने सापळयाचे आयोजन करून लोकसेवक क्र १ यांच्या वतीने लोकसेविका क्र. २ **श्रीमती कल्पना हरी गवळी** यांना तक्रारदार यांचेकडून १५,०००/—रुपयांची लाच स्विकारताना त्यांचे राहते घरी रंगेहात पकडण्यात आले. व लोकसेवक क्र. १ **श्री. गोरक्ष अशोक खोसे** यांना त्यांचे राहते घरातून ताब्यात घेण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :— **ला.प्र.वि., पालघर, सुर्या कॉलनी तळ मजला,पालघर कोर्ट समारे, पालघर (प)**
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in
dyspacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net
टोल फ्री नं :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२५२५/२९७२९७
व्हॉटस् ॲप क्र. :— ९९३०९९७७००

(भारत साळुंखे)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कॅम्प पालघर